सिट्रस इस्टेट ढिवरवाडी, ता. काटोल, जि. नागपूर बाबनिहाय निधी बदलास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः सीइओ २०२५/ प्र.क्र. २३९/९अे**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक : २४ फेब्रुवारी,२०२६

**संदर्भ** :- १) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक संप्रऊ-२०१८/प्र. क्र.८९/९-अे, दि.०७.०३.२०१९

२) संचालक (फलोत्पादन) यांचे जा.क्र.कृआ/फलो-२/सि. इस्टेट/बा. ब . प्रस्ताव/प्र.क्र.१४२५ /२०२५/र -२४१ दि. २९.०७.२०२५

३) संचालक (फलोत्पादन) यांचे जा.क्र.कृआ/फलो-२/सि. इस्टेट/बा. ब . प्रस्ताव/प्र.क्र.२५२५ /२०२५/ र -६५६ दि. ३१.१२.२०२५

**प्रस्तावना** :-

महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादनात अग्रेसर राज्य असून, राज्यातील हवामान अनेक फळपिकांकरिता पोषक आहे. राज्यात प्रामुख्याने संत्रा, मोसंबी या लिंबूवर्गीय फळपिकांचे क्षेत्र विदर्भात जास्त आहे. संत्रा हे फळ आरोग्यासाठी अतिशय पोषक व महत्वाचे फळपिक असून यामध्ये पोटॅशियम, व्हिटॅमिन सी, अ‍ॅन्टी कॅन्सरचे गुणधर्म आहेत. विदर्भ विभागात “नागपूर संत्रा” या स्थानिक जातीच्या संत्र्याची लागवड होते. संत्रा फळपिकाबाबत शेतकऱ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्याअनुषंगाने संत्र्याची उत्पादकता व दर्जा वाढविण्यासाठी पंजाब राज्याप्रमाणे “सिट्रस इस्टेट” स्थापन करण्याकरिता उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त संदर्भ क्र.२ व ३ नुसार संचालक (फलोत्पादन) यांनी सिट्रस इस्टेट योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सिट्रस इस्टेट ढिवरवाडी , ता. काटोल , जि. नागपूर करिता बाबनिहाय व निधी बदलासंदर्भात प्रस्ताव सादर केले आहेत. त्यास अनूलक्षून सिट्रस इस्टेट ढिवरवाडी , ता. काटोल , जि. नागपूर करिता बाबनिहाय व निधी बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय** :-

१. सिट्रस इस्टेट ढिवरवाडी , ता. काटोल , जि. नागपूर “सिट्रस इस्टेट” अंतर्गत बाबनिहाय निधीची आवशक्यता :

सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे बाबनिहाय निधी बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर सिट्रस इस्टेट साठी उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील दिनांक ०७.०३.२०१९ च्या शासन निर्णयामधील इतर सर्व तरतुदी लागू राहतील.

२.    सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२२४१७१६२६६४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.02.24 17:17:24 +05'30'

**(ललितकुमार धायगुडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति ,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३) मा.विधानपरिषद/विधानसभा सदस्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) अ.मु.स. (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
५) अ.मु.स. (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
६) अ.मु.स, (कृषि) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई -३२
७) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य,पुणे.
८) संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
९) विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती
१०) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अमरावती
११) सहाय्यक संचालक (लेखा) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता ) (लेखा परीक्षा ) मुंबई /नागपूर,
१३) संचालक लेखा व कोषागार अधिकारी, मुंबई ( २ प्रती)
१४) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
१५) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१६) निवड नस्ती.

## शासन निर्णय क्रमांकः सीइओ २०२५/ प्र.क्र. २३९/९अे, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ चे सहपत्र

## (परिशिष्ट-अ)

## सिट्रस इस्टेट ढिवरवाडी, ता. काटोल, जि. नागपूर.

| अ. क्र | सिट्रस इस्टेट साठी आवश्यक बाबी | मंजूर निधी | बाब बदलानंतर आवश्यक सुधारीत निधी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | उच्चतंत्रज्ञान आधारीत रोपवाटिका स्थापन करणे. | २५.०० | १००.०० | प्रूनिंग मशीनची खरेदी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून करण्यात यावी. |
| २ | प्रशासकीय इमारत बांधकाम कार्यालय, प्रयोगशाळा, प्रशिक्षण भवन, निविष्ठा विक्री केंद्र इ. (फर्निचर, विद्युत जोडणी खर्चासह) | २००.०० | २००.०० | एकाचवेळी ५०० शेतकऱ्याना निर्यातीच्या संदर्भात प्रशिक्षण देण्याऐवजी छोटे छोटे गट तयार करून प्रशिक्षण देण्यात यावे. अपेडाकडून शक्य नसल्यास एन. एस. ए. एम. बी कडून प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच दरमहा (३१ मार्च पर्यंत ) किती शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल याचे उदिष्ट निश्चित करावे व त्याची काटेकोरपणे अमलबजावणी करावी. |
| ३ | कलेक्शन, ग्रेडिंग, कोटिंग, पेंकिग, साठवणूक युनिटची स्थापना करणे. | १५०.०० | १५०.०० | बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर बाबी चलविण्यासाठी एफ. पी. ओ यांना नेमण्यात यावे. विपणन साखळी गटापर्यंत किती टन संत्री/मोसंबी विक्री केलेली आहे याची माहिती सादर करावी. |
| ४ | अवजारे बैंक स्थापन करण्यासाठी आवश्यक अवजारे व यंत्रसामुग्री ट्रॅक्टर्स व ट्रॅक्टरचलीत सर्व अवजारे, आधुनिक फवारणी यंत्र, blowers, electrostatic pump), छाटणी यंत्र (prunner) पॉवर टिलर इत्यादी | १२५.०० | ७५.०० | |
| ५ | प्रयोगशाळा (माती, पाणी, उती व पाने चाचणी प्रयोगशाळा आणि जिवाणू खते उत्पादनासाठी लागणारे साहित्य) | १००.०० | १००.०० | सध्या उपलब्ध असलेल्या इमारतीमध्ये प्रयोगशाळा स्थापन करावी व त्यासाठी आनुषंगिक साहित्य खरेदी करावे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | संशोधन, निवड पध्दतीने संत्र्याचे वाण विकसित करणे | २५.०० | ०.०० | |
| ७ | खेळते भांडवल (corpus fund) | ५००.०० | ५००.०० | |
| ८ | शेतकरी प्रशिक्षण, तंत्रज्ञान प्रात्यक्षिके इत्यादी | २५.०० | २५.०० | शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी प्रभावी कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा. त्यासाठी ऑडिओ व्हीज्यूएलस तयार करण्यात यावेत. |
| ९ | संकीर्ण खर्च (५% प्रमाणे) | ६२.५० | ६२.५० | |
| **एकूण** | | **१२१२.५०** | **१२१२.५०** | |

LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.02.24 17:17:44 +05'30'

**(ललितकुमार धायगुडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**